महाराष्ट्र शासन

# कला संचालनालय

सर ज.जी.कला महाविद्यालय आवार, डॉ.दा.नौ.मार्ग, मुंबई - ४०० ००१. दुरध्वनी क्र.२२६२०२३१/३२ web:-www.doa.maharashtra.gov.in

क्रमांक - डिओओ/२०२१-२२/चार/ ५१ दिनांक :- 17 FEB 2022

संदर्भ :- १) या कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक डिओओ/२०२१-२२/चार/३४५, दिनांक १०.०२.२०२२.
२) राज्यातील शासकीय रेखाकला (इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड) परीक्षा ऑनलाईन न घेणेबाबत. मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांच्या दालनात दिनांक १६.०२.२०२२ रोजी आयोजित केलेली बैठक.

## परिपत्रक

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेस (इयत्ता १० वी) प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता फक्त इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड परीक्षा ऑनलाईन पध्दतीने आयोजित करण्याच्या अनुषंगाने या https://doaonline.in/doadrawinggradeexam/public/login या संकेतस्थळावर विद्यार्थ्यांची नाव नोंदणी करण्याकरिता संदर्भीय परिपत्रक क्रमांक १ अन्वये कळविण्यात आले होते.

शासकीय रेखाकला (इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड) परीक्षा ऑनलाईन पध्दतीने घेण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला असल्यामुळे संदर्भिय क्रमांक १ वरील दिनांक १०.०२.२०२२ रोजीचे परिपत्रक रद्द करण्यात येत असून वरील नाव नोंदणी करण्याची लिंक बंद करण्यात आली आहे. त्यानुसार यापूर्वी ऑनलाईन नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क त्यांच्या खात्यावर जमा करण्यात येणार आहे.

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील इयत्ता १०वी, मुलभूत / कला शिक्षक प्रशिक्षण पदविका (प्रथम वर्ष) अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांकरिता एप्रिल, २०२२ मध्ये ऑफलाईन पध्दतीने शासकीय रेखाकला (इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड) २०२१ या परीक्षेचे आयोजन करण्यात येणार आहे. त्याकरिता पूर्वीप्रमाणेच परीक्षा केंद्रांवर विद्यार्थ्यांनी आपल्या नावाची नोंदणी करावयाची आहे. मा.मंत्री महोदय यांनी दिलेल्या आदेशानुसार एकही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही याबाबत सर्व संबंधितांनी दक्षता घ्यावयाची आहे.

ऑफलाईन पध्दतीने परीक्षा आयोजनाबाबतची सविस्तर माहिती www.doa.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर स्वतंत्रपणे प्रसिध्द करण्यात येईल.

(राजीव मिश्रा)
कला संचालक,
कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,
सर्व शासकीय रेखाकला परीक्षा केंद्र प्रमुख/मुख्याध्यापक /प्राचार्य/ संबंधित विद्यार्थी व पालक यांचेकरिता.
प्रत :- माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

१) आयुक्त(शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) शिक्षण संचालक, (माध्यमिक )महाराष्ट्र राज्य, पुणे.
३) विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व).
४) अध्यक्ष/सचिव, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे.
५) निरीक्षक, चित्रकला व शिल्प, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६) शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हापरिषद (सर्व)
७) शिक्षणनिरीक्षक, बृहन्मुंबई दक्षिण/उत्तर/पश्चिम.
८) निवड नस्ती.